मातृबद्ध नाळ कापून मी प्रवेश केला या विश्वात
तेव्हाच मला निसर्गसत्य उमगले होते, की मी
कधीतरी ही विश्वबद्ध नाळ कापून सामावणार आहे
अमूर्त आईच्या व्यापक ओटी-पोटीत संपण्यासाठी
कायमचा !

आपण जन्मतो,
बावरतो,
वावरतो परिसराच्या समुदायात

आपण खातो
पितो
जगतो शरीर घट्ट धरून ठेवून.

आपण वाढतो
वाकतो
उरतो मनमानस जागे ठेवून

मज्जापेशींच्या शक्तीधाग्यांएवढे आपले आयुष्य
आपल्या असण्याच्या गर्भातच नसण्याचे संकेत दडलेले
आपल्याला जन्म देणारी आणि मृत्यूनंतर उरणारी
आपली जनुके, जपतात, आपल्या आयुष्याच्या जन्मखुणा
कायमच्या !

३१.१.२०१९